राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. केपीएमजी कंपनीस मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीटी -३६१९/प्र.क्र.३६/पोल-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, २ रा मजला, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०७.०८.२०१९

<u>वाचा:</u>

१. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय ,शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), दि ०१.०७.२०१४ व दि.२०.०३.२०१९
२. गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक गृहआ-२०१५/प्र.क्र.२३०/आस्थापना-२, दि.२०.५.२०१५.
३. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.२३.८.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४. गृह विभाग,कार्यादेश क्रमांक टीआरए/१२१३/प्र.क्र.९/शिकाना/पोल-८, दि.६.९.२०१६.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च शक्ती प्रदान समितीच्या दि.०५.०३.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना -</u>

ई-चलान प्रकल्पासाठी १०.०९.२०१६ ते १०.०२.२०१७ या कालावधीसाठी मे.केपीएमजी यांची प्रकल्प सल्लागार म्हणुन संदर्भ क्र.४ येथील कार्यादेशानुसार नियुक्ती करण्यात आली होती, तथापि प्रकल्प अंमलबजावणीसाठी प्रकल्प सल्लागार यांनी कार्यादेशाच्या मुदतीनंतरही सेवा दिली आहे. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च शक्ती प्रदान समितीच्या दि.०५.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत प्रकल्प सल्लागार यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, त्याअनुषंगाने आदेश निर्गमित करणे विचाराधीन होते.

<u>शासन निर्णय -</u>

ई-चलान प्रकल्पासाठी मे.केपीएमजी कंपनीला प्रकल्प सल्लागार म्हणुन दि. १०.०२.२०१७ ते दि.३१.०३.२०१९ कालवधीसाठी प्रत्यक्ष दरमहिना-दरमाणुस (मॅन-मंथ) तत्वानुसार मुदतवाढ देण्यात येत आहे. या कालावधीत सल्लागारांना माहिती व तंत्रज्ञान विभागाने निश्चित केल्याप्रमाणे मानधन अनुज्ञेय असेल.

२. ई-चलान प्रकल्पासाठी दि.०१.०४.२०१९ ते दि. ३०.०९.२०१९ पर्यंत मे.केपीएमजी कंपनीच्या दोन वरीष्ठ सल्लागारांना मुदतवाढ देण्यात येत आहे, या दोन वरिष्ठ सल्लागारांना माहिती व तंत्रज्ञान विभागाने निश्चित केल्याप्रमाणे मानधन अनुज्ञेय असेल.

३. ई-चलान प्रकल्पासाठी दि. १.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० पर्यंत एका वरिष्ठ सल्लागाराची नेमणुक करण्यात येत आहे. या वरिष्ठ सल्लागारास माहिती व तंत्रज्ञान विभागाने निश्चित केल्याप्रमाणे मानधन अनुज्ञेय असेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०७१७२९३०४१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2019.08.07 17:34:24 +05'30'

(दिनेश सस्ते)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव,गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अपर पोलीस महासंचालक,वाहतुक,मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
७. विशेष पोलीस महानिरीक्षक,सायबर,मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष,नवीन प्रशासकीय भवन,मंत्रालय, मुंबई.
११.कक्ष अधिकारी, व्यय-७ / वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.मे. केपीएमजी ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि , मुंबई.
१३.निवड नस्ती / पोल-३
१४.अर्थ शाखा गृह विभाग.